Established : June 1969
**Mahatma Gandhi Mahavidyalaya,**
**Ahmedpur Dist. Latur**
**(Arts, Commerce & Science)**
E-mail : principal_mgm@rediffmail.com
Web : www.mgmahmedpur.org

स्थापना : जुन १९६९
**महात्मा गांधी महाविद्यालय,**
अहमदपूर जि. लातूर
(कला, वाणिज्य व विज्ञान)
NAAC Re-Accreditation "A" Grade
☎ : (Office) 02381-262060
P.B. No. 07

# महात्मा गांधी महाविद्यालयाचा सन 2021-22 चा वार्षिक अहवाल

विचार विकास मंडळ, अहमदपूर संचलित महात्मा गांधी महाविद्यालयात इयत्ता अकरावी व बारावी (कला, वाणिज्य, विज्ञान), पदवीस्तरावर बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.सी.ए. व बी.एस्सी (सी. एस.) आणि पदव्युत्तर इंग्रजी, मराठी, भूगोल व एम. एस्सी. संगणकशास्त्र इत्यादी वर्ग चालतात. तसेच महाविद्यालयामध्ये वनस्पतीशास्त्र, गणित, पदार्थविज्ञान, इंग्रजी, भूगोल इत्यादी विषयामध्ये संशोधनाची सोय उपलब्ध आहे. सन 2021-22 मध्ये या संशोधन केंद्रांतर्गत संशोधक 10 विद्यार्थ्यांनी विद्यापीठामध्ये शोधप्रबंध सादर केलेले आहेत.

वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक 23, कनिष्ठ 42, शिक्षकेत्तर कर्मचारी 40 आणि संस्थेकडून पगारी कर्मचारी एकूण 09 कार्यरत आहेत.

**महाविद्यालयाची प्रवेशित संख्या -**

शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये महाविद्यालयाची प्रवेशित संख्या कनिष्ठ महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत एकूण 1395 विद्यार्थी आणि पदवी व पदव्युत्तर वर्गात मिळून 1508 अशी एकूण प्रवेशित विद्यार्थी संख्या 2903 एवढी आहे.

**उन्हाळी 2022 परीक्षेचा निकाल -**

उन्हाळी 2022 परीक्षेचा सरासरी निकाल कनिष्ठ महाविद्यालयातील कला, व वाणिज्य या दोन्ही शाखेचा निकाल 100.00% लागला असून विज्ञान या शाखेचा निकाल 99.30% लागलेला आहे. वरिष्ठ महाविद्यालय बी.ए. शाखेचा एकुण निकाल 78.30% (विशेष प्राविण्यासह 21), बी.एस्सी. शाखेचा एकुण निकाल 68.45 % (विशेष प्राविण्यासह 28), बी.कॉम. शाखेचा एकुण निकाल 84.50% (विशेष प्राविण्यासह 44), बी.सी.ए शाखेचा एकुण निकाल 100.00% बी.एस्सी. (सी.एस.) एकुण निकाल 95.68% (विशेष प्राविण्यासह 10) उत्तीर्ण झाले, एम.ए. इंग्रजी एकूण निकाल 80.00% (विशेष प्राविण्यासह 3), एम.ए. मराठी एकूण निकाल 50.50% , एम.ए. भूगोल एकूण निकाल 88.50% (विशेष प्राविण्यासह 6), एम.एस्सी. संगणकशास्त्र एकूण निकाल 98.80% (विशेष प्राविण्यासह 5) विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

उन्हाळी **2022** च्या विद्यापीठ परीक्षेत महाविद्यालयस्तरावर एम.एस्सी. संगणशास्त्र या विषयामध्ये महाविद्यालयातील राठोड अक्षय बाबुराव आणि एम.ए. भूगोल या विषयामध्ये दोडे संगमेश्वर बंकटराव या विद्यार्थ्याने गुणानुक्रमे प्रथम क्रमांक मिळविला आहे तर बी.ए. या शाखेतील भुरेपाटील सुयश मल्लीकार्जून या विद्यार्थ्याने गुणानुक्रमे महाविद्यालयस्तरावर सर्व प्रथम क्रमांक मिळविला आहे. तसेच बी.कॉम शाखेतून कु. चव्हाण अनुसया राजकुमार व बी.एस्सी. शाखेतून कु. वलसे गायत्री बलवान या विद्यार्थीनीने महाविद्यालयस्तरावर अनुक्रमे प्रथम क्रमांक मिळविलेला आहे.

**ग्रंथालय –**

शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये महाविद्यालयातील एकूण ग्रंथाची संख्या 96796 असुन त्यापैकी कनिष्ठ महाविद्यालयाची ग्रंथसंख्या 41609 आणि वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथ संख्या 55187 एवढी आहे व त्यापैकी 14151 ग्रंथ रद्दबादल करण्यात आलेली आहेत. सद्यस्थितीमध्ये ग्रंथालयात (कनिष्ठ व वरिष्ठ) एकूण ग्रंथ संख्या 82645 आहे.

ग्रंथालयामध्ये एकूण 56 नियतकालिके व 12 दैनिक वृत्तपत्र मागविले जातात. तसेच दरवर्षी ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. रंगनाथन यांची जयंती सप्ताह साजरी केली जाते. भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरी केली जाते.

१. दिनांक १५ ऑगस्ट २०२१ रोजी महाविद्यालयात स्वातंत्र्या दिन साजराकरण्यात आला व त्यानिमित्ताने भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. विषय : 'करोना एक आपत्ती'
२. दिनांक ०४ सप्टेंबर २०२१ रोजी महात्मा गांधी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.
३. दिनांक ५ सप्टेंबर २०२१ रोजी महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने 'शिक्षक दिन' साजरा करण्यात आला.
४. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त दि. १७ सप्टेंबर २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील ऑनलाईन शिक्षणाची दशा आणि दिशा या शिर्षकाचे दुसरे भित्तीपत्रक प्रकाशित करण्यात आले.
५. दि. २४ सप्टेंबर २०२१ रोजी स्वा. रा. ती. म. वि. व महात्मा गांधी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने वनस्पतीशास्त्र, भौतिकशास्त्र व प्राणिशास्त्र या विषयांवर विद्यापीठ बी. एस्सी तृतीय वर्ष अभ्यासक्रमावर कार्यशाळा घेण्यात आली.
६. दि. २८ सप्टेंबर २०२१ ते ४-१०-२०२१ दरम्यान औरंगाबाद ७ महाराष्ट्र गर्ल्स एन.सी.सी. बटालियन, यांच्या तर्फे राष्ट्रीय छात्र सेनेचे शिबीर घेण्यात आले.

७. दिनांक २ ऑक्टोबर २०२१ रोजी महात्मा गांधी महाविद्यालयात महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती, राष्ट्रीय स्वच्छता दिन कार्यक्रम व रक्तदान शिबीर कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले एकुण ४६ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

८. सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील तिसऱ्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. शेतकऱ्यांच्या व्यथा आणि वेदाना.

९. महाविद्यालयात कोवीड - १९ प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या तीन कॅम्पचे आयोजन करण्यात आले.

१०. दिनांक ३० ऑक्टोबर २०२१ रोजी महाविद्यालयात कोव्हीड १९ लसीकरण मोहिम राबवण्यात आली.

११. प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. देसाई आर.बी. यांना संशोधनाचे पेटंट मंजुर झाल्याबद्दल महाविद्यालयात सत्कार करण्यात आला.

१२. दिनांक ०५-०६- व ७ नोव्हेंबर २०२१ रोजी हॅन्डबॉलेचे पितामह स्वर्गीय प्राध्यापक बाबूराव नलवाड यांच्या स्मरणार्थ हॅण्डबॉल स्पर्धेचे आयोजन महात्मा गांधी महाविद्यालयात करण्यात आले.

१३. दि. १४ नोव्हेंबर २०२१ रोजी पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या जयंती निमित्ताने जैवतंत्रज्ञान दिन साजराकरण्यात आला. वनस्पतीशास्त्र व प्राणीशास्त्र विभागाने ऑनलाईन वस्तुनिष्ठ प्रश्नमंजूषा आयोजन करून परीक्षा घेण्यात आली.

१४. दि. २२ नोव्हेंबर २०२१ रोजी भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण पथकाच्या वतीने महात्मा गांधी महाविद्यालयात रेड क्रॉस क्लब व एन.एस.एस. च्या वतीने स्वेच्छा रक्तदान या विषयावर पोस्टर स्पर्धा घेण्यात आली. तसेच एच.आय.व्ही. व टी.बी. या विषयावर शॉर्टव्हिडोओ फिल्म स्पर्धा घेण्यात आली त्यामध्ये विद्यार्थीनीने एकुण २०,०००/- (वीस हजार रुपये) बक्षीस प्राप्त केले.

१५. दि. ३० नोव्हेंबर २०२१ रोजी स्वा.रा.ती.म.वि.नांदेड व मं.गां.म. अहमदपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित'ब'विभागीय आंतर महाविद्यालयीन कबड्डी (पुरूष व महिला) स्पर्धा दिनांक ३० नोव्हंबर २०२१ रोजी घेण्यात आल्या.

१६. दिनांक २१ डिसेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय गणित परिषद National Conference on Mathematical Techniques and application (NCMTA) घेण्यात आली व भूकंपमापक यंत्र तसेच आद्ययावत जीम (व्यायाम शाळेचे उद्घाटन) स्वा.रा.ती.म. विद्यापीठाचे कुलगुरु मा.डॉ. उध्दवजी भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

१७. दिनांक ३ जानेवारी २०२२ रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमीत्ताने'आम्ही सावित्रीच्या लेकी' हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रमुख व्याख्यात्या श्रीमती माळी मॅडम, यशवंत विद्यालय, अहमदपूर या होत्या.

१८. दिनांक १८ जानेवारी २०२२ रोजी मराठी विभागा तर्फे ऑनलाईन कार्यक्रम घेण्यात आला. विषय : रोजगाराभिमुख मराठी भाषा मार्गदर्शक : प्रा. डॉ. ज्ञानेश्वर डाकोरे ,शिवाजी महाविद्यालय, कंधार हे होते.

१९. २० जानेवारी २०२२ रोजी सार्वजनिक आरोग्य विभाग, लातूर व शिक्षण विभाग, पंचायत समिती, अहमदपूर यांच्या संयुक्त विद्यमाने मिशन युवा स्वास्थ्य लसीकरण १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी कोविड १९ लसीकरण मोहिम राबविण्यात आली.

२०. दिनांक १९ फेब्रूवारी २०२२ रोजी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. तसेच महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून घेण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत महात्मा गांधी महाविद्यालयाची कु. सुमित्रा नागनाथ पारखे हिने तृतीय क्रमांक पटकावला व तिला प्रोत्साहनपर २०५१/- (दोन हजार एकावन रुपये) बक्षीस मिळाले.

२१. दिनांक २६ जानेवारी २०२२ रोजी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने महाविद्यालयाचे भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.

**विषय :'कोरोना आणि शिक्षण व्यवस्था'**

२२. दिनांक २८ फेब्रूवारी २०२२ रोजी मराठी विभागातर्फे'मराठी भाषा गौरव दिना'निमित्त विशेष व्याख्यान घेण्यात आले.

**विषय :- 'संतांचा मराठी भाषा अभिमान'मार्गदर्शक :- प्रा. डॉ. हंसराज जाधव, प्रतिष्ठाण महाविद्यालय,पैठण** हे होते.

२३. दिनांक ०३ मार्च २०२२ रोजी महात्मा गांधी महाविद्यालयाचा विद्यार्थी 'विशाल कांडणगीरे' भूगोल विषयाच्या विद्यापीठस्तरीय सामान्यज्ञान परिक्षेत गुणानुक्रमे सर्वद्वितीय आला. त्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला.

२४. महात्मा गांधी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी कदम गणेश गोविंद हा NET झाल्यामुळे त्याचा महाविद्यालय परिवारा तर्फे सत्कार करण्यात आला.

२५. महात्मा गांधी महाविद्यालयाची माजी विद्यार्थीनी कु. साळवे आशा (Chemistry) ही SET परिक्षा उत्तीर्ण झाली असुन तिचे महाविद्यालय, परिवारा तर्फे अभिनंदन व सत्कार करण्यात आला.

२६. दिनांक ०८ मार्च २०२२ रोजी महाविद्यालयात 'महिला दिन' साजरा करण्यात आला त्यानिमित्ताने महाविद्यालयातर्फे 'आधुनिक काळातील महिलांचे विविध क्षेत्रातील योगदान ' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

२७. दिनांक ०९ मार्च २०२२ रोजी महात्मा गांधी महाविद्यालयात विज्ञान दिवस साजरा करण्यात आला त्यामध्ये बीड येथील डॉ. सय्यद सरांचे मार्गदर्शन झाले व विद्यार्थी असोसिएशन च्या विद्यार्थ्यांचा व अध्यक्ष सचिव यांचा सत्कार व पोस्टर आणि P.P.T स्पर्धांमध्ये पहिल्या आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

२८. स्वा.रा.म.विद्यापीठ अंतर्गत महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण व नैसर्गीक साधन संपत्तीचे संवर्धन व स्वच्छ भारत अभियान युवक शिबीर मौजे- टाकळगांव (का) ता. अहमदपूर जि. लातूर येथे दि. १९ ते २५ मार्च २०२२ दरम्यान घेण्यात आले या शिबीरामध्ये महिला मेळावा, शेतकरी मेळवा, पशुरोग निदान शिबीर, आरोग्य शिबीर घेण्यात आले तसेच विध्यार्थ्यांनी बंधारा बांधकाम,वृक्षारोपण, स्वच्छता व समाजप्रबोधन केले.

२९. महात्मा गांधी महाविद्यालयाचा खेळाडू ब्रम्हानंद मुळे यांची इराण मध्ये झालेल्या अशिया कप हॅण्डबॉल स्पर्धेकरीता भारताच्या संघामध्ये निवड झाली

३०. आय.आय.टी जॅम परीक्षेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील सिराज अहमद शेख हा गणितात देशात ३९ वा आला आहे. तसेच निशांत सुतार, आस्था विनोद कुडीया, माधव वाघमारे यांनी घवघवीत यश मिळविले आहे. या गुणवंताचे व मार्गदर्शक प्रा. औदुंबर मुळे यांचे कौतुक संस्थाध्यक्ष ॲड.किशनराव बेंडकुळे सचिव, ॲड.पी.डी.कदम प्राचार्य कॅप्टन डॉ.अनिता शिंदे,उपप्राचार्य पी.बी. बाभूळगांवकर आदिंनी केले आहे.

३१. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता व कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ६-४-२०२२ ते दिनांक १६-०४-२०२२ या कालावधीत महाविद्यालयात करण्यात आले. यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी अनेक उपक्रम राबविण्यात आले. निबंधस्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, अभिवादन व १२ तास वाचन, ग्रंथप्रदर्शन व समारोप कार्यक्रम घेण्यात आले. तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी महाविद्यालयात अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला. ग्रंथप्रदर्शन १२ तासाचे वाचन उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यात सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**General Secretary**
**Vichar Vikas Mandal**
**Ahmedpur Dist. Latur**

**(कॅप्टनडॉ. अनिता एम. शिंदे)**
**प्राचार्य / PRINCIPAL**
Mahatma Gandhi Mahavidyalaya
Arts Commerce & Science
AHMEDPUR Dist.Latur

**महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तरकर्मचारी - 2021-22**

| | |
|---|---|
| कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक | 42 |
| वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक | 23 |
| घड्याळी तासीकेवरील प्राध्यापक | 20 |
| मानधनावरील प्राध्यापक | 14 |
| कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकेत्तरकर्मचारी | 2 |
| वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकेत्तरकर्मचारी | 40 |
| रोजंदारी वरील कर्मचारी | 9 |
| **एकूण** | **150** |

(कॅप्टनडॉ. अनिता एम. शिंदे)
प्रभारी प्राचार्य

PRINCIPAL
Mahatma Gandhi Mahavidyalaya
Arts Commerce & Science
AHMEDPUR Dist.Latur